(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

**[२०२३] ३ एस. सी. आर. ६४९**

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. .... अपीलकर्ता

वि.

बाबूलाल लाडे आणि इतर .... उत्तरवादी

(दिवाणी अपील क्र. २३२/२०१६

मधील

किरकोळ अर्ज क्र. १३०८/२०२०)

दिनांक २४ मार्च, २०२३

**[एम. आर शहा आणि कृष्णा मुरारी, न्या. न्या. ]**

सेवाविषयक कायदा : वेतन/ मजुरी - प्रदान - अपीलकर्ता- बँकेने लिलाव केलेल्या मालमत्तेच्या विक्रीतून मिळालेल्या उत्पन्नामधून कर्मचाऱ्यांची थकबाकी प्रदान करणे - अपीलकर्ता बँकेने एकूण देय रकमेच्या २५% इतकी रक्कम या न्यायालयात तसेच विशिष्ट रक्कम औद्योगिक न्यायालयात सुद्धा जमा केली होती - त्यानंतर अपीलकर्ता बँकेने ती रक्कम व्याजासह जिल्हाधिकारी यांच्या खात्यात जमा करण्याची आणि योग्य ओळख पटवून प्रमाणशीररीत्या साखर कारखान्याच्या प्रत्येक कर्मचाऱ्याला त्यांच्या पात्रतेप्रमाणे वितरित करण्याची मागणी केली - असा निर्णय देण्यात आला की : परिसमापित साखर कारखान्याच्या संबंधित कर्मचाऱ्यांच्या मजुरी/ वेतनापोटी देय असलेली रक्कम त्यांना आणि/ किंवा त्यांच्या कायदेदेशीर वारसदारांना अदा करण्यात यावी - तसेच, रक्कम योग्य व्यक्तीच्या हाती जाते हे पाहण्यासाठी,

संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्याच्या तपशीलासह सर्व तपशील आवश्यक - अशा प्रकारे विशिष्ट निर्देश जारी - या न्यायालयात जमा केलेली रक्कम व्याजासह आणि औद्योगिक न्यायालयात जमा केलेली रक्कम व्याजासह जिल्हाधिकारी यांना, सदर कर्मचाऱ्यांना/कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसदारांना, योग्य ओळख पटवून आणि त्यांच्या दाव्यांची पडताळणी करून वितरित करण्यासाठी वर्ग करण्यात यावी - बँकेला सुद्धा अतिरिक्त जमा केलेली रक्कम काढून घेण्याची परवानगी देण्यात आली.

**दिवाणी अपीलिय अधिकारिता** *:* दिवाणी अपील क्र. २३२/२०१६ मधील किरकोळ अर्ज क्र. १३०८/२०२०.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील दिवाणी अपील क्र. २३२/२०१६ मधील दिनांक ०४.१२.२०१९ रोजीच्या न्यायनिर्णय आणि आदेश यांमधून

सह

दिवाणी अपील क्र. २३२/२०१६ मधील किरकोळ अर्ज डायरी क्र. १७५५/२०२१.

एम. वाय. देशमुख, श्रीमती मनजीत किरपाल, श्री. अद्वितीय शर्मा, अमितकुमार पाठक, सत्यजित ए. देसाई, श्रीमती अनघा एस. देसाई, सत्य काम शर्मा, गजानन एन, तीर्थकर, सौरभ आनंद, धर्मेंद्र कुमार सिन्हा, राजू सोनकर, श्रीमती ममता श्रीवास्तव, सौ. पूजा सोनकर, चंदर शेखर अश्री, उपस्थित पक्षकारांचे अधिवक्ते.

न्यायालयाचा आदेश **एम. आर. शहा, न्या.** यांनी दिला *:-*

विलंब माफ करण्यात आला आहे.

**१.** दिवाणी अपील क्र. २३२/२०१६ मधील किरकोळ अर्ज क्र. १३०८/२०२० द्वारे मूळ अपीलकर्ता - अर्जदार - महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.ने या मा. न्यायालयात जमा केलेली ३.५२ कोटी रुपयांची रक्कम व्याजासह जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या खात्यात वर्ग करण्याची विनंती केली आहे. पुढे अशीही विनंती करण्यात आली आहे की, साखर कारखान्यातील प्रत्येक कर्मचाऱ्याची योग्य ओळख पटवून त्यांच्या हक्काप्रमाणे प्रमाणशीररीत्या रक्कम वितरित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, भंडारा यांना दयावेत.

१.१. बँकेने आणखी एक अं अ. /कि. अ. दाखल केला आहे, ज्यामध्ये अपीलकर्ता - बँकेने आजपर्यंत जमा केलेली अतिरिक्त रक्कम व्याजासह म्हणजेच रु. ४,९५,९४,७३७/- काढून घेण्यास बँकेला परवानगी देण्याची विनंती केली आहे. कि. अ. डायरी क्र. १७५५/२०२१ मध्ये, बँकेने उत्तरवादी -साखर कारखान्यातील ज्या कर्मचाऱ्यांची यांची कायदेशीर थकबाकी प्रलंबित आहेत, त्यांना त्यांची कायदेशीर थकबाकी सिद्ध करण्यासाठी, थकबाकीच्या आणि त्यांच्या दाव्यांच्या समर्थनार्थ संबंधित कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश द्यावेत आणि त्यांची कायदेशीर थकबाकी प्रदान करण्यासाठी त्यांच्या बँक खात्यांच्या आवश्यक तपशीलासह असा तपशील सादर करण्याचे आणि या मा. न्यायालयाने दिवाणी अपील क्र. २३२/२०१६ मध्ये दिनांक ०४.१२.२०१९ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, साखर कारखान्याकडून आजवर

असलेल्या एकूण थकबाकीच्या तक्त्यासह त्यांचे तपशील सादर करण्याचे निर्देश देण्यात यावेत अशी विनंती केली आहे.

२. प्रारंभी, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, दिवाणी अपील क्र. २३२/२०१६ मधील दिनांक ०४.१२.२०१९ रोजीच्या सविस्तर न्यायनिर्णय व आदेश यांद्वारे या न्यायालयाने साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचा अपीलकर्ता - बँकेकडून रक्कम प्राप्त करण्याचा अधिकार कायम केला आहे आणि असा निर्णय दिला आहे की, अर्जदार / अपीलकर्ता बँकेने लिलाव केलेल्या मालमत्तेच्या विक्रीतून मिळालेल्या उत्पन्नामधून कर्मचाऱ्यांची थकबाकी दिली पाहिजे. परंतु, या बाबीची नोंद घेणे आवश्यक आहे की, जोपर्यंत अपीलकर्ता - बँकेचे दायित्व केवळ कर्मचाऱ्यांना वेतनाची / मजुरीची थकबाकी देणे असेल आणि कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील भविष्य निर्वाह निधी, उपदान (ग्रॅच्युइटी), बोनस इ. सर्व इतर वैधानिक थकबाकीचा प्रश्न आहे, तोपर्यंत ही जबाबदारी नंतरच्या खरेदीदारावर निश्चित करण्यात आली आहे. असे दिसते की उपरोक्त अपील प्रलंबित असताना आणि अंतरिम आदेश पारित करताना, या न्यायालयाने अर्जदार/ अपीलकर्ता बँकेला वेतनाच्या एकूण रकमेच्या २५ % रक्कम जमा करण्याचे निर्देश दिले आणि त्या अनुषंगाने अर्जदार / अपीलकर्ता बँकेने रु. ३.५२ कोटी इतकी रक्कम या न्यायालयात जमा केली आणि ती मुदत ठेवीमध्ये गुंतविण्यात आली आहे. व्याजासह ही रक्कम रु. ४,९५,९४,७३७/- इतकी होते असा अहवाल देण्यात आला आहे. यापूर्वी औद्योगिक न्यायालय, भंडारा यांनी दिलेल्या आदेशानुसार अपीलकर्ता बँकेने दिनांक ११.०२.२०२१ रोजीच्या दर्शनी धनाकर्षाद्वारे (डिमांड ड्राफ्टद्वारे) रु. १३,८९,८४,३३४/- इतकी रक्कम "सदस्य,

औद्योगिक न्यायालय, भंडारा" यांच्या नावे  जमा केली होती, ही बाब अभिलेखावर आली आहे.

३. अशा प्रकारे, वरील रकमेपैकी (रु. १३,८९,८४,३३४/- + रु. ४,९५,९४,७३७/-)परिसमापित साखर कारखान्याच्या संबंधित कर्मचाऱ्यांच्या मजुरी /वेतनापोटी देय असलेली  रक्कम योग्य पडताळणी केल्यानंतर  व ओळख पटविल्यानंतर त्यांना आणि/ किंवा त्यांच्या कायदेशीर वारसदारांना (मूळ कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असल्यास) अदा करावी लागेल आणि ती  दिनांक २३.०८.२०११ रोजी  जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रानुसार अदा करावी लागेल, तर कर्मचाऱ्यांना  एकूण देय असलेली रक्कम रु.१३,८९,८४,३३४/- इतकी आहे,  ज्यात  भविष्य निर्वाह निधी, उपदान (ग्रॅच्युइटी), बोनस इ. वैधानिक थकबाकीपोटी देय असलेल्या  रकमेचा समावेश आहे. परंतु, त्याचवेळी ही रक्कम, त्याला  देय असलेली रक्कम मिळण्यास पात्र असलेल्या योग्य व्यक्तीकडे जाते का,   हे पाहणे आवश्यक आहे आणि  त्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्याच्या तपशीलांसह संपूर्ण तपशील असणे आवश्यक आहे.

४.  संबंधित पक्षकारांच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांचे म्हणणे  ऐकून घेतल्यानंतर आणि दिवाणी अपील क्र. २३२/२०१६ मध्ये या न्यायालयाने यापूर्वी दिलेला आदेश विचारात घेऊन खालील निर्देशांसह प्रस्तुत अर्ज निकाली काढण्यात येत आहेत :-

(i) या न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या आदेशानुसार अपीलकर्ता - बँकेने या न्यायालयात जमा केलेली रु. ३.५२ कोटी इतकी रक्कम त्यावरील व्याजासह, जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या खात्यात वर्ग करण्यात यावी, जेणेकरून जिल्हाधिकाऱ्यांना सदर रक्कम परिसमापित साखर कारखान्यातील संबंधित कर्मचारी/कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसदारांना वितरित करणे शक्य होईल ;

(ii) औद्योगिक न्यायालय, भंडारा यांच्याकडे पडून असलेली रु. १३,८९,८४,३३७४/- इतकी रक्कमसुद्धा त्यावरील व्याजासह जिल्हाधिकारी, भंडारा यांना जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या खात्यात वर्ग करण्यात यावी ;

(iii) जिल्हाधिकारी, भंडारा यांना, संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनाची /मजुरीची थकबाकी आणि संबंधित थकबाकीवर ७.५ % दराने व्याज, परिसमापित साखर कारखान्याच्या संबंधित कर्मचाऱ्यांना / कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसदारांना त्यांच्या दाव्यांची योग्य पडताळणी करून आणि त्यांची ओळख पटवून अदा/ वितरित करण्याचे आणि सदर रक्कम परिसमापित साखर कारखान्याच्या संबंधित कर्मचाऱ्यांच्या / कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसदारांच्या बँक खात्यात थेट जमा / अदा करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

(iv) परिसमापित साखर कारखान्यातील संबंधित कर्मचाऱ्यांना / कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसदारांना सदर रक्कम, वर नमूद केल्यानुसार अत्यंत पारदर्शक पध्दतीने व परिसमापित साखर कारखान्यातील संबंधित कर्मचाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसदारांच्या दाव्यांची योग्य ओळख व

पडताळणी करून, लवकरात लवकर परंतु दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पूर्वी वितरीत करण्यात यावी.

(v) वर नमूद केलेल्या परिसमापित साखर कारखान्यातील संबंधित कर्मचाऱ्यांना / कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसदारांना वरीलप्रमाणे रकमेचे प्रदान केल्यानंतर शिल्लक रक्कम, जर असल्यास, कायद्यानुसार विचारात घेण्यात यावी आणि शिल्लक रक्कम अपीलकर्ता - बँकेला बँकेच्या थकबाकीपोटी देण्यात यावी.

याप्रमाणे प्रस्तुत अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

x-x-x-x

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x